<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(सकाळ)

जा.क्र. ८३० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २० / १२ / २०१६

**१) सौरउर्जेच्या बॅटऱ्यांची चोरी . :–**

दिनांक १६+१७/१२/२०१६ चे रात्र दर. यातील सार्वजनीक ठिकाणी ग्रा.प. तर्फे खांबावर लावलेल्या सौर उर्जेच्या ४ नग बॅटऱ्या कि. ८,०००/–रू च्या कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी कु. हर्षविला वसंतराव तलमले वय ३४ वर्ष रा.ग्रामसेवक सेन्द्री बु.यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची आमोरासमोर धडक लागुन एक जखमी. :–**

दिनांक १९/१२/२०१६ रोजी ०९.३० वा. दर. यातील आरोपीतांनी आपआपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपणे, अनियंत्रीत पणे चालवुन एकमेकांच्याा मोटार सायकला आमरा–समोर धडक मारून दोन्ही चालक व एमएच ३६ यु १६११ चे मागे बसलेला धनराज कोलबाजी बिरोले यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. नवखरे यांचे चौकशी अहवालावरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरून भांडण करून विटाने कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१२/२०१६ चे २२.०० वा. दर. यातील फिर्यादीस आरोपी हा प्रेस चे दुकाणा जवळ मिळाला त्यावर फिर्यादीने आरोपीस आपना फिरून येवुन असे बोलुन त्याचे सोबत थोडी मजाक लेकी या कारणावरून तु माझी मजाक का करतोस असे म्हणुन तोंडातोंडी भांडण करून विटाने कपाळावर मारून जखमी केल्याने फिर्यादी प्रणय पदमाकर बंड वय २५ वर्ष रा. सावरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) ) क्षुल्लक कारणावरून भांडण करुन पाटीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १८/१२/२०१६ चे २२.०० वा. दर. यातील फिर्यादी कैलास सहादेव साठवणे वय २४ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा हा किशोर भवसागर यांचे नगरपरीषदचे विजयी रॅली मध्ये असतांना यातील अरोपीने फिर्यादीजवळ जाऊन तु माझे सोबत चल असे म्हटले असता फिर्यादीने येण्यास नकार दिल्याने आरोपीने त्याच्या हातातील लाकडी पाठीने पाठीवर व डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.
आरोपी अटक आहे.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १९/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. आंधळगाव व लाखनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ हातभट्टी दारू कि. ७५०/–रू. व ३६० मिली देशी दारूकि. १००/–रू. तसेच जगारातुन कि. ४९०/–रू. चा माल असा एकुण कि. १,३४०/–रू. जप्त करण्यात आला .

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.